REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 15 | ISSUE - 1 | OCTOBER - 2025

# "छत्रपती संभाजीनगर शहरातील माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंगविषयक समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती - एक अभ्यास"

डॉ. शेख सुभान हसन
सहायक प्राध्यापक,
मराठवाडा कॉलेज ऑफ एज्युकेशन, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

## प्रस्तावना :-



१९६० मध्ये 'सर्वांसाठी शिक्षण' (Education for all) ही संकल्पना जगातील अनेक देशांत अस्तित्वात आली होती. या संकल्पनेस हळुहळु चालना मिळून तिचा १९८१ च्या काळात प्रसार होऊ लागला. भारत सरकारने १९७९-८० या वर्षापासून अपंगांकरिता एकात्मिक शिक्षण योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये पूर्णअंध, अल्पदृष्टी, कर्णबधीर, अवयवातील कमतरता, मतिमंद, मनोविकृती, आत्ममग्न, मेंदूचा पक्षाघात, बहुविकलांग, कुष्ठरोगग्रस्त इत्यादी लक्षणे असणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आला आहे. १९९० मध्ये सर्वांसाठी शिक्षण या संकल्पनेतून 'समावेशक शिक्षण' या संकल्पनेचा उदय झाला. १९९४ मध्ये भारतासह एकूण ९२ देशांनी आणि २५ शैक्षणिक संघटनांनी या संकल्पनेस मान्यता दिली व स्वीकारली आहे. १९९९ मध्ये युनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization : UNESCO) या संस्थेने नियमित शाळेतील भिन्न मुलांच्या गरजांनुसार सर्वांसाठी अध्यापन कार्यनीती विकसीत करावी, असे सुचविले. २०१४ नंतर भारतामध्ये कोणत्याही प्रकारची शारीरिक, मानसिक अक्षमता असलेल्या व्यक्तींना अपंगाऐवजी दिव्यांग असे संबोधले जाऊ लागले. अपंगांच्या शिक्षणाचा हक्क जितका महत्त्वाचा आहे, तितकीच त्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. अपंग विद्यार्थ्यांमध्ये असलेली न्यूनगंडाची भावना नाहीशी करून त्यांना सामान्य विद्यार्थ्यांसोबत सामावून घेऊन शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अपंग एकात्मिक शिक्षण योजना सुरू करण्यात आली. सौम्य व मध्यम अपंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याची तरतूद या योजनेत करण्यात आली आहे.

1. "सामान्य मुलांबरोबर अपंग मुलांनाही शिक्षणात समाविष्ट करून त्यांना एकत्रितपणे शिक्षण देणे, म्हणजे अपंग एकात्मिक शिक्षण."
2. "भिन्न क्षमता असूनही विशेष गरजा असलेल्या बालकांना सामान्य बालकांसमवेत एकाच वर्गात शिकण्याची समान संधी ज्या शिक्षणात दिली जाते, त्यास समावेशक शिक्षण म्हणतात. हे शिक्षण 'समान संधी' तत्त्वावर आधारलेले असून या शिक्षणपद्धतीच्या मुख्य प्रवाहात सर्वांचा स्वीकार केला जातो."
3. युनेस्कोच्या मते, 'वंचित बालके, युवक व प्रौढ यांच्या अध्ययन गरजांचा शोध घेत लक्ष केंद्रित करणारा विकासात्मक उपागम म्हणजे समावेशक शिक्षण'.
4. "समावेशक शिक्षण म्हणजे सर्व मुलांना एकाच वर्गात, एकाच शाळांमध्ये शिकविणे. यामध्ये केवळ अपंग मुलेच नव्हे तर अल्पसंख्याक व इतर मुलांचाही यामध्ये समावेश होतो. "

समावेशक शिक्षणामुळे सर्वसामान्य मुले आणि अपंग मुले यांचा एकमेकांशी संबंध येत असल्यामुळे वातावरणात ते एकमेकांना मदत करायला शिकतात; एकमेकांपासून ते संवाद व आंतरक्रियात्मक कौशल्ये शिकतात; आंतरक्रियांपासून ते मैत्री, आपुलकी, परस्परसंबंध, वर्ग सभासद म्हणजे काय इत्यादी शिकतात. उभय प्रकारची मुले परस्परांशी सकारात्मक वागतात. परिणामी भावी नागरीक म्हणून सामान्य मुलांना विशेष गरजा असलेल्या नागरीकांची कसे वागावे, हे उमजते.समावेशक शिक्षणामुळे ७५ टक्के अपंग असलेल्या विद्यार्थ्यांना सर्वसामान्य शाळेत प्रवेश मिळाल्याने विशेष शाळेच्या मर्यादित वातावरणापेक्षा सर्वांबरोबर शिक्षणाची संधी मिळेल. तसेच प्रार्थना, कला, क्रिडा, मधल्या सुट्टीत डबा खाणे, स्पर्धा इत्यादींबाबत विशेष मुलांना वर्गातील सामान्य मुलांशीसमायोजन कसे करायचे हे समजते. कठपुतळी, चित्रपट, व्याख्यान, आदर्श वाचन, आदर्श वर्तन यांसारख्या कार्यक्रमांतून उभय मुलांच्या जाणीवा रुंदावल्यामुळे त्यांच्यामध्ये अपेक्षित जाणीव निर्माण होते.

**उद्दिष्टये :-**

1. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंगविषयक समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती यांचा अभ्यास करणे.

**परिकल्पना :-**

1. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.
2. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाविषयी असणाऱ्या धोरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.
3. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाच्या अध्ययन- अध्यापन विषयक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.
4. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य याविषयीचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :-**

1. संबंधित संशोधन हे छत्रपती संभाजीनगर शहरापुरतेच मर्यादित आहे.
2. संबंधित संशोधन हे केवळ माध्यमिक स्तरावरील शिक्षकांशी संबंधित आहे.
3. संबंधित संशोधन हे माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंगविषयक समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याच्याशी संबंधित आहे.

**संशोधन पद्धती :-**

सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**लोकसंख्या:-**

छत्रपती संभाजीनगरशहरातील माध्यमिक स्तरावरील सर्व शिक्षक हि सदरील संशोधनाची जनसंख्या आहे

**नमुना:-**

छत्रपती संभाजीनगर शहरातील दहा माध्यमिक शाळेतून प्रत्येकी ०५ शिक्षक अश्या एकूण ५० शिक्षणाची निवड करण्यात आली सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने करण्यात आले आहे.

**माहिती संकलनाचे साधन :-**

संबंधित संशोधनामध्ये माहिती संकलनासाठी समावेशक शिक्षणाच्या समावेशक शिक्षणाचे धोरण,समावेशक शिक्षणाचे अध्ययन - अध्यापन विषयक वातावरण व समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य या तीन पैलूंचा विचार करून एकूण तीस विधाने तयार करण्यात आली त्यामध्ये उत्तरासाठी पूर्णपणे सहमत, सहमत, सांगता येत नाही, असहमत, पूर्णपणे असहमत असे पाच पर्याय देण्यात आले. त्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अं.क्र. | समावेशक शिक्षणाचे पैलू / घटक | प्रश्न क्रमांक | एकूण प्रश्न |
|---|---|---|---|
| 1. | समावेशक शिक्षण विषयक धोरण | १,३,४,६,७,८,१०,१२,१७,२२ | ११ |
| 2. | समावेशक शिक्षणाचे अध्ययन - अध्यापन विषयक वातावरण | १३,१४,१५,१८,१९,२१,२३,२४,२५,२६,२७,३० | १२ |
| 3. | समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य | ५,९,११,१६,२०,२८,२९ | ०७ |

**संशोधनाची कार्यपद्धती :-**

सुगम यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवडण्यात आलेल्या माध्यमिक स्तरावरील शिक्षकांकडून माहिती संकलनासाठी समावेशक शिक्षण विषयक धोरण, समावेशक शिक्षणाचे अध्ययन - अध्यापन विषयक वातावरण, समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य या विषयीची चाचणी भरून घेण्यात आली व प्राप्त माहितीवर योग्य संख्याशास्त्रीय साधनांचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले.

**प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-**

**नियम सारणी क्रमांक :- 01**

**समावेशक शिक्षण विषयक अभिवृत्ती / दृष्टीकोनाचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अं.क्र. | समावेशक शिक्षणाचे पैलू / घटक | अभिवृत्ती / दृष्टीकोनाचा स्तर | | |
|---|---|---|---|---|
| | | सकारात्मक | तटस्थ | नकारात्मक |
| 1. | समावेशक शिक्षणाबद्दल ( सर्व पैलू / घटक ) | ९० पेक्षा जास्त | ९० | ९० पेक्षा कमी |
| 2. | समावेशक शिक्षणाच्या धोरणांबद्दल | ३३ पेक्षा जास्त | ३३ | ३३ पेक्षा कमी |
| 3. | समावेशक शिक्षणाच्या अध्ययन - अध्यापन वातावरणाबद्दल | ३६ पेक्षा जास्त | ३६ | ३६ पेक्षा कमी |
| 4. | समावेशक शिक्षणाच्या अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्यांबद्दल | २१ पेक्षा जास्त | २१ | २१ पेक्षा कमी |

**सारणी क्रमांक :- 02**

**माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या सर्व समावेशक शिक्षण विषयक अभिवृत्ती / दृष्टीकोनाचे मध्यमान व सर्व समावेशक शिक्षण विषयक अभिवृत्ती / दृष्टीकोनाचा स्तर दर्शवणारी सारणी**

| अं.क्र. | समावेशक शिक्षणाचे पैलू / घटक | मध्यमान | अभिवृत्ती / दृष्टीकोनाचा स्तर |
|---|---|---|---|
| 1. | समावेशक शिक्षणाबद्दल (सर्व पैलू / घटक ) | १०७.२२ | सकारात्मक |
| 2. | समावेशक शिक्षणाच्या धोरणांबद्दल | ३२.३५ | नकारात्मक |
| 3. | समावेशक शिक्षणाच्या अध्ययन - अध्यापन वातावरणाबद्दल | ३७.४७ | सकारात्मक |
| 4. | समावेशक शिक्षणाच्या अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्यांबद्दल | २०.७६ | नकारात्मक |

**परिकल्पना पडताळणी :-**

1. **माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.**

   माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - १०७.२२ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार सकारात्मक आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.

2. **माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाविषयी असणाऱ्या धोरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.**

   माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाविषयी असणाऱ्या धोरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - ३२.३५ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार नकारात्मक आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाविषयी असणाऱ्या धोरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर नकारात्मक आहे.

3. **माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाच्या अध्ययन - अध्यापन विषयक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.**

   माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाच्या अध्ययन - अध्यापन विषयक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - ३७.४७ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार सकारात्मक आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा स्विकार करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाच्या अध्ययन - अध्यापन विषयक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे

4. **माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य याविषयीचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.**

   माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य याविषयीचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा अभ्यास केला असता या शिक्षकांचे मध्यमान सारणी क्रमांक ०२ नुसार - २०.७६ आले ज्याचा स्तर नियम सारणी क्रमांक ०१ नुसार नकारात्मक आहे त्यामुळे संबंधित परिकल्पनेचा त्याग करावा लागेल व हे मान्य करावे लागेल कि, माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य याविषयीचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर नकारात्मक आहे.

## मुख्य निष्कर्ष :–

1. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.
2. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाविषयी असणाऱ्या धोरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर नकारात्मक आहे.
3. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाच्या अध्ययन- अध्यापन विषयक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर सकारात्मक आहे.
4. माध्यमिक स्तरावरील शिक्षकांचा अपंग समावेशक शिक्षणाचे अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य याविषयीचा दृष्टीकोन / अभिवृत्ती याचा स्तर नकारात्मक आहे.

## समारोप :–

समावेशक शिक्षणामध्ये शिक्षकाने सर्वप्रकारच्या मुलांकडे लक्ष दिले पाहिजे, मुलांना विषय ज्ञान देताना त्यांच्यामध्ये अध्यापन कुशलतेची आवश्यकता असते. तो अध्यापन करीत असताना दुसऱ्या शिक्षकांकडून जरूर तेव्हा त्यास आधार देऊन अध्यापनातील उणीव भरून काढली जाते. अशा वेळी उभय शिक्षकांमधील संबंध लवचिक आणि संपर्क प्रभावी असणे आवश्यक आहे. वरील निष्कर्षानुसार अपंग समावेशक शिक्षणाविषयी असणाऱ्या धोरणाविषयी व अभ्यासक्रम आणि अध्यापन साहित्य याविषयी शिक्षकांमध्ये नकारात्मक दिसून आली असली तरी शिक्षक सर्वांना सामावून घेऊनच आपले कार्य करत असतात यात शंका नाही

## संदर्भ :-


1. https://marathivishwakosh.org/3070/
2. https://socialwelfare.vikaspedia.in/viewcontent/social-welfare/
3. https://marathivishwakosh.org/49336/
4. https://iedjalna.blogspot.com/p/blog-page_35.html
5. chromeextension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/https://www.aiirjournal.com/uploads/Articles/2018/04/3245_113.Mali%20SIr%20&%20Dr.Deshpande.pdf
6. chromeextension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/https://ycmou.ac.in/media/publication/research_paper/KSS_RP_149
7. chromeextension://efaidnbmnnnibpcajpcglclefindmkaj/http://www.dksg.co.in/EContent/Course%209%20Creating%20an%20inclusive%20School
8. पंडित,बन्सी बिहारी (१९८७), शिक्षणातील संशोधन संख्यात्मक व गुणात्मक, पुणे : नुतन प्रकाशन.
9. मुळे.रा.श. आणि उमाटे, वि.मु. (१९७७), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, नागपूर : साहित्य प्रचार केंद्र सीताबर्डी.
10. कदम.चा.प. (१९९९), शैक्षणिक संख्याशास्त्र (दुसरी आवृत्ती ) पुणे : नुतन प्रकाशन.
11. आगलावे, प्रदीप (२०००), संशोधन पद्धतिशास्त्र व तंत्र नागपूर : विद्या प्रकाशन.
12. भिंताडे,वि.रा. (२००५), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नुतन प्रकाशन.
13. शेटकर,ग.वि. व जोशी, शोभना (२००६), शैक्षणिक मूल्यमापन व कृती संशोधन, औरंगाबाद : मृण्मयी प्रकाशन.
14. घोरमोडे,के.यु. आणि घोरमोडे,कला (२००६ ), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, (प्रथम आवृत्ती ), नागपूर : विद्या प्रकाशन.
15. बरवे, मीनाक्षी आणि कुंडले, सुरेखा ( २००८ ), शैक्षणिक मूल्यमापन संख्याशास्त्र व कृती संशोधन, पुणे : नित्यनुतन प्रकाशन..
16. भांडारकर,के.एम. ( २०१० ), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्यनुतन प्रकाशन.